


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● सोमवार ११ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहर/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.
दैनिक वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
** पात्रता **
१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
संपर्क-९४२२६६००७७
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

# महायुतीचं आज जागावाटप पक्कं?
# राजकारणात पडद्यामागे नेमकं काय घडतंय?
## महायुतीची दिल्लीत महत्त्वाची बैठक होणार आहे.



महायुती आणि मविआ दोघांचाही जागावाटपाचा तिढा पुढच्या ४८ तासात मिटण्याची चिन्हं आहेत. दोन्हींकडून दावे होतायत की जागावाटपाची चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात होतेय. मात्र आधी कोण उमेदवार जाहीर करणार, याची दोघांकडून वाट पाहिली जात असल्याचं बोललं जातंय. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरेंच्या मते जागावाटपाची ८० टक्के चर्चा पूर्ण झालीय. दोन्ही घटकपक्षांना भाजप सन्मानजनक जागा देणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, परभणीची जागा महायुतीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सुटण्याची चिन्हं आहेत. विशेष म्हणजे महायुतीच्या जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी उद्या सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या पुन्हा दिल्लीला जाणार आहेत. तिथे त्यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत जागावाटपावर चर्चा होणार आहेपरभणी लोकसभेतून सध्या ठाकरेंचे खासदार आहेत. या लोकसभेत जिंतूर, परभणी, गंगाखेड, पाथरी, जालना, परतूर आणि घनसावंगी असे ६ मतदारसंघ येतात. 2019 ला शिवसेनेचे संजय जाधवांविरुद्ध राष्ट्रवादीचे राजेश विटेकर लढले होते. शिवसेनेच्या संजय जाधवांना 5,38,941 तर राष्ट्रवादीच्या विटेकरांना 4,96,742 मतं पडली होती. निकालात संजय जाधव जिंकले. विटेकरांचा 42,199 मतांनी पराभव झाला., त्यांच्या पराभवात वंचितचा हात राहिला. वंचितच्या आलमखीर मोहम्मद खान यांनी 1,49,946 मतं घेतली होती. यावेळी राजेश विटेकर अजित

### मविआचे 13 तर महायुतीचे 3 उमेदवार फिक्स

मिळालेल्या माहितीनुसार, मविआचे 13 तर महायुतीचे अद्याप 3 उमेदवार फिक्स झाले आहेत. मविआत फिक्स मानल्या जात असलेल्या उमेदवारांपैकी बारामतीतून सुप्रिया सुळे, शिरुर लोकसभेतून अमोल कोल्हे, ठाण्यातून राजन विचारे, मावळ लोकसभेतून संजोग वाघिरे, धाराशीव लोकसभेतून ओमराजे निंबाळकर, रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभेतून विनायक राऊत, दक्षिण मुंबई लोकसभेतून अरविंद सावंत, रायगडमधून अनंत गीते, परभणी लोकसभेतून संजय जाधव, साताऱ्यातून श्रीनिवास पाटील, नाशिक लोकसभेतून विजय करंजकर, छत्रपती संभाजीनगरमधून चंद्रकांत खैरे, तर कोल्हापुरातून छत्रपती शाहू महाराज यांची उमेदवारी पक्की मानली जातेय. तर महायुतीत बारामतीतून सुनेत्रा पवार, मुंबई दक्षिण मध्यमधून राहुल शेवाळे तर बीडमधून पंकजा मुंडेंची उमेदवार खात्रीशीर मानली जातेय.

## लोकसभा निवडणूक

### आमदार रवींद्र वायकर यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश !



शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय अशी ख्याती असलेले आमदार रवींद्र वायकर यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या 'वर्षा' निनासस्थानी वायकरांचा भव्य पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमावेळी मंचावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार गजानन कीर्तिकर होते. तसेच माजी नगरसेविका शीतल म्हात्रे या कार्यक्रमात सूत्रसंचालन करताना दिसल्या. यावेळी रवींद्र वायकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्यामागचं कारण सांगितलं. आपल्या मतदारसंघातील विकासकामांसाठी आपण शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करत असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

### काळजाचा जवळचा व्यक्ती शिंदेंच्या शिवसेनेत चालला, ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया



शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे अतिशय जवळचे निकटवर्तीय म्हणून ख्याती असलेले आमदार रवींद्र वायकर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत. ते आज शिंदेंच्या वर्षा निवासस्थानी दाखल झाले आहेत. त्यांचा पक्षप्रवेशाचा भव्य कार्यक्रम आज वर्षा बंगला परिसरात पार पडत आहे. जवळपास दीड हजार जण या कार्यक्रमात उपस्थित राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या पक्षप्रवेशावर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला. त्यांनी आज गोरेगाव विधानसभा मतदारसंघाचा दौरा केला. यावेळी उद्धव ठाकरेंनी जनसंवाद कार्यक्रमात रवींद्र वायकर यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला. तसेच त्यांनी भाजपवरही टीका केली.

# महिला दिना निमित्त मोफत आरोग्य तपासणी.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिनांक ९ मार्च २०२४ रोजी डीव्हाईं फॉउंडेशन सिवूड नेरूळ,वनवासी कल्याण आश्रम उरण ,आणि डॉ. डी वांय पाटील हॉस्पिटल नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने विंधनें आदिवासी वाडी उरण येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.वाडीवरील ११९ रुग्णांनी याचा लाभ घेतला, या शिबिरा साठी डॉ अंकिता,आणि डॉ.वृत्ती स्त्रीरोगतज्ञ , डॉ.धृत, डॉ.हर्षवर्धन हे बालरोगतज्ञ डॉ.व्यंकट एमडी मेडीसिन यांनी आपली सेवा दिली.२४ आदिवासी बांधवांचे इ सी जी देखील तेथे काढण्यात आले.आणि ५० बांधवांचे मधुमेह तसेच रक्त तपासणी करण्यात आली.ज्या रुग्णांना पुढील उपचारांची आवश्यकता आहे त्यांना डी वय पाटील हॉस्पिटल नेरूळ येथे मोफत उपचार देण्यात येतील आणि त्यासाठी जमल्यास नेण्याची व्यवस्था हॉस्पिटल करेल असे समन्वयक राजेश डोके यांनी सांगितले .सर्व रुग्णांना डोस प्रमाणे औषधे,प्रोटीन पावडर आणि सकस आहार म्हणून चणे आणि नाचनीचे पीठ डीव्हाईं फॉउंडेशनचे अध्यक्ष डी एच सुब्रमण्यम, सुजाता रंगनाथन यांच्या तर्फे देण्यात आले. औषधे वाटपसाठी फा. हरेश जगदाळे, फा.बळीराम पेणकर आणि वनवासी कल्याण आश्रमचे अध्यक्ष फा.मनोज ठाकूर यांनी सहकार्य केले. वनवासी कल्याण आश्रमाचे वामन म्हात्रे,सुनंदा वाघमारे, दीपक गोरे,डीव्हाईंन फोंडेशनचे विजय, चारुदत्त कोरे शाळेतील शिक्षक राजेश चोगले , संदीप पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




### आधी 10 जागा सांगितलेल्या, दोन किंवा तीन तरी घ्या रोहित पवारांनी अजित पवारांना डिवचलं



शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे अतिशय जवळचे निकटवर्तीय म्हणून ख्याती असलेले आमदार रवींद्र वायकर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत. ते आज शिंदेंच्या वर्षा निवासस्थानी दाखल झाले आहेत. त्यांचा पक्षप्रवेशाचा भव्य कार्यक्रम आज वर्षा बंगला परिसरात पार पडत आहे. जवळपास दीड हजार जण या कार्यक्रमात उपस्थित राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या पक्षप्रवेशावर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला. त्यांनी आज गोरेगाव विधानसभा मतदारसंघाचा दौरा केला. यावेळी उद्धव ठाकरेंनी जनसंवाद कार्यक्रमात रवींद्र वायकर यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला. तसेच त्यांनी भाजपवरही टीका केली.

# ब्रह्मापुरी येथे जागतिक महिला दिन साजरा

**वादळवार्ता/चंद्रपुर**

चंद्रपुर जिल्हा वंचित बहुजन महिला आघाडी च्या जिल्हा उपाध्यक्षा लिंनाजी रामटेके व जेष्ठ कार्यकर्त्या आनुराधा कोसे यांच्या उपस्थीत जागतिक महिला दिन साजरा ब्रहमापुरी तालुक्यामध्ये संत गाडगे बाबा हॉल (पंचायत समिती च्या जवळ जागतिक महीला दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षा अनुराधा कोसे जेष्ट कार्यकर्त्या, कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक.ॲड.शर्मिला रामटेके, प्रा.गणवीर लिनाजी रामटेके जिल्हा उपाध्यक्षा चंद्रपुर वंचित बहुजन महिला आघाडी चंद्रपुर,ब्रम्हपुरी येथील बुद्ध विहारातील सर्व महीला भगिनी मंडळ,कार्यक्रमाचे संचालन शितल गायकवाड, व प्रीती हुमणे व आभार प्रदर्शन चंदा माटे यांनी केलेसर्व महीलांनी वेगवेगळ्या विषयांवर परिसंवाद साधला रांगोळी स्पर्धा,वेशभूषा,व इतर स्पर्धा राबविण्यात आल्या. स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले



# शिरुरकासार तालुक्यातील शेतकऱ्यांनी तलावातील गाळ काढून शेतात टाकावा
## ना. तह.शिवनाथ खेडकर यांचे आवाहन

**वादळवार्ता/शिरूर कासार**

शिरुर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांनी आप आपल्या जवळच्या तलावातील गाळ काढून जमीन सुपीक करण्यासाठी शेतात नेऊन टाकण्याचे आवाहन नायब तहसिलदार शिवनाथ खेडकर यांनी केले आहे. राज्य शासनाने या वर्षी गाळ मुक्त धरण व गाळ युक्त शिवार या योजनेला मुदतवाढ दिल्याने यापुढेही राज्यात कायमस्वरूपी ही योजना राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. धरण व तलावातील गाळ काढून तो शेतात टाकण्यासाठी ही योजना राबवली जात आहे त्या नुसार दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या आदेशानुसार तालुक्यात ही योजना राबवण्यात येणार असून तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपली जमीन सुपीक करण्यासाठी तालुक्यातील तलावातील गाळ काढून आप आपल्या शेतात नेऊन टाकण्याचे आवाहन शिरूरकासार तहसिल चे नायब तहसिलदार शिवनाथ खेडकर यांनी केले आहे.

# मनोज पाटील यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय जाती कल्याण, शारीरीक व मानसिकदृष्ट्या अपंग, कुष्ठरोगी आदींसाठी तसेच समाजकल्याण क्षेत्रात मौलीक कार्य करणाऱ्या राज्यातील गुणवंत व्यक्तींचा दरवर्षी शासनाच्या वतीने राज्यस्तरीय "डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार" देवून शासकीय कार्यक्रमात गौरविण्यात येतो .सदर पुरस्कार हा उरण तालुक्यातील पाणदिवे गावचे सुपुत्र मनोज पाटील यांना जाहिर झाला आहे. १५ हजार रुपये रोख, सन्मान चिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार १२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ड्स जमशेदजा भाभा नाट्यगृह, नरिमन पॉईंट,मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

मनोज पाटील यांनी आपल्या महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून गेली २५ वर्ष विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत.पुनाडे आदिवासी वाडीतील विद्यार्थ्यांना दत्तक घेवून गेली १५ वर्षे त्यांचा शैक्षणिक खर्च करत आहेत. नेत्र तपासणी शिबीरातून शेकडो नेत्र रूग्णावर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या आहेत.रक्तदान शिबीरे,आरोग्य तपासणी शिबीरे ,महिला व बालविकास कल्याण या शासकीय योजनेतून पालक नसलेल्या विद्यार्थांना शैक्षणिक खर्च मिळवून दिला आहे.कोव्हीडच्या काळात आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंच वाटप केले आहे .एड्स या रोगाबाबत गेली २५ वर्षे जनजागृत करण्यात येत आहे.कर्मयोगी बाबा आमटे यांच्या आनंदवन व सोमनाथ प्रकल्पात जावून तेथे राष्ट्रीय एकता शिबीरात रायगड च प्रतिनिधीत्व करून सामाजिक हित साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

सुधागड एज्युकेशन सोसायटी पाली च्या सुरवातीला रावे व आत्ता कळंबोली शाखेत शैक्षणिक अध्यापनाच एकूण २८ वर्ष कार्य करत आहेत.गेल्याच वर्षी त्यांना शैक्षणिक कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा "क्रांतीज्योती सावित्रीमाई राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारांने" गौरविण्यात आले होते.

मनोज पाटील यांना जाहीर झालेल्या राज्यस्तरीय" डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार "बद्दल त्यांचे रायगड जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

## संपादकीय

### महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री!

सन १९४६ साली तेव्हाच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळाची निवडणूक होऊन यशवंतराव चव्हाण हे दक्षिण सातारा मतदार संघातून निवडले गेले आणि संसदीय चिटणीस झाले. सन १९४८ साली त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या चिटणीस पदावर नियुक्ती झाली व १९५२च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य व पुरवठा खात्याचे मंत्री झाले. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी दि.१ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्रे हाती घेतली. सन १९६० साली महाराष्ट्र राज्य स्थापन झाले व त्यांत ते पहिले मुख्यमंत्री निवडले गेले. पुढे १९६२-६६ या काळात ते भारताचे संरक्षणमंत्री, १९६६-७० या कालावधित गृहमंत्री, १९७०-७४ पर्यंत अर्थमंत्री आणि १९७४पासून परराष्ट्रमंत्री बनले होते.

यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि एक राष्ट्रीय नेते होते. देवराष्ट्रे- सातारा जिल्ह्यातील कराड येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात दि.१२ मार्च १९१३ रोजी त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण कराड येथे घेऊन उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे घेतले. ते बीए नंतर एल्एल्बी झाले. इ.स.१९३० साली महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी भाग घेतल्याने त्यांना पहिला तुरुंगवास घडला. या कारावासात मार्क्सवाद व मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांशी त्यांचा परिचय झाला. त्यामुळे काँग्रेसमधील रॉयपंथीय गटाशी त्यांचे संबंध वाढले. दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या वेळी यशवंतरावांना रॉय यांनी घेतलेली युद्धविषयक भूमिका अमान्य झाली. ते काँग्रेसमध्येच राहून १९४२च्या छोडो भारत आंदोलनात सामील झाले. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. यातून पुढे प्रतिसरकार स्थापन झाले, परंतु त्यावेळी ते तुरुंगात होते. त्यामुळे प्रतिसरकारशी त्यांचा तसा फारसा संबंध राहिला नव्हता. यशवंतराव हे मानवेंद्रनाथ रॉय यांची विचारसरणी व महात्मा गांधींची आंदोलने यांकडे आकर्षित झाले, तरी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या आचारविचारांचा त्यांच्यावर खोल ठसा उमटला होता. नेहरूंप्रमाणे डावीकडे झुकलेला मध्यममार्गी नेता, असे त्यांचे वर्णन करता येईल. त्यांच्या शासकीय तसेच प्रशासकीय कौशल्याचा व लोकनेतृत्वाचा प्रत्यय आला, जेव्हा द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे आले. त्यांनी अल्पसंख्य बिगरमराठी समाजाचा आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचा विश्वास आपल्या कर्तबगारीने तथा कार्यक्षम कारभाराने संपादन केला. मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्याने काहीही उलथापालथ होणार नाही, याची खात्री त्यांनी वरिष्ठ नेत्यांना पटवून दिली.

यशवंतरावांनी चिनी आक्रमणानंतर संरक्षण खात्यात चैतन्य आणण्याची जबाबदारी पार पाडली. सन १९६७च्या निवडणुकीनंतर काँग्रेसचा अनेक राज्यांत पराभव झाला. त्यामुळे देशात जी अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती, त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते खंबीरपणे पण कौशल्याने सांभाळले. अर्थखाते त्यांच्याकडे आले, तेही बांगला देशाचे युद्ध, दुष्काळ वगैरेंमुळे खालावलेल्या आर्थिक परिस्थितीत. माजी संस्थानिकांचे तनखे रद्द करणे आदी उपाययोजना त्यांच्या कारकीर्दीत झाल्या. चलनवाढीला आळा घालण्याचे कडक उपाय योजण्याच्या धोरणाचा प्रारंभही यशवंतरावांच्या कारकीर्दीतच झाला. कार्यक्षम मंत्री, यशस्वी संसदपटू आणि जनसामान्यात ज्याची मुळे रुजली आहेत, असा उदारमतवादी नेता असे यशवंतरावांचे थोडक्यात वर्णन करता येईल. चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ ते राजकारणात होते आणि पंचवीसपेक्षा अधिक काळ अधिकार पदावर त्यांनी काढला. ते उत्तम वक्ते आणि लेखक होते. त्यांची विचारप्रवर्तक भाषणे सह्याद्रीचे वारे व युगांतर या ग्रंथांतून संगृहीत केलेली आहेत. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रांत अनेक नव्या उपक्रमांना चालना दिली. हे उपक्रम जसे सहकारी साखर कारखानदारीचे आहेत तसेच जिल्हा परिषदा, भाषा संचालनालय, साहित्य संस्कृती मंडळ आदी प्रकारचेही आहेत. त्यांच्याबद्दल परप्रांतीयांना आशा वाटत होती, तर महाराष्ट्रीयांना ते एक विश्वासाचे ठिकाण होते.

सन १९६९ साली काँग्रेसमध्ये फूट पडली असता ती सावरण्याच्या कामी यशवंतरावांनी आटोकाट प्रयत्न केले. देशात यादवीचे वातावरण न ठेवता समन्वयाचे असावे; कारण भारतासारख्या प्रचंड, भिन्न भिन्न जातिधर्मांच्या देशात त्याखेरीज आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती होणार नाही, अशी त्यांची धारणा होती. पुरोगामी विचारांचा ते पाठपुरावा करत असर, ते पोथीनिष्ठ कधीच नव्हते. नीतिमूल्यांचा पुरस्कार व्यवहारात व्हावा, अशी त्यांची इच्छा व प्रयत्नही असत. झगमगाटापेक्षा संथपणा व सातत्य हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते आणि तेच त्यांचे शक्तिस्थानही! लोकप्रिय नेते यशवंतराव चव्हाण यांनी दि.२५ नोव्हेंबर १९८४ रोजी जगाचा निरोप घेतला.

# गटार नाटकाचा जबरदस्त प्रयोग

**'वादळवार्ता/ बीड**

बहुजन रंगभूमी, नागपूर द्वारा आयोजित,वीरेंद्र गणवीर द्वारा लिखित- दिग्दर्शित 'गटार' नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या उदघाटक डॉ. दीपाताई क्षीरसागर, अध्यक्ष अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा, बीड तर पूजा वाघमारे, नगरसेवक ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. उदघाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. दिपाताई यांनी आंबेडकरी जलसे ते दलित रंगभूमी ह्याचा सविस्तर इतिहास मांडला. नाटक हे मनोरंजन आणि प्रबोधनाचे उत्कृष्ट माध्यम आहे, त्यातून सामाजिक जाण आणि भान ठेवून, वेदनांची क्रांती करण्याचं काम, बहुजन रंगभूमी करते असे सांगून ह्याच क्रांतिभूमी नागपूरचं नाटक बीड ला होतेय आणि त्यातही 87 वा प्रयोग म्हणून पूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. प्रो. दुष्यंता रामटेके यांनी सद्यस्थितीतील बहुजन रंगभूमीवर प्रकाश टाकला. गटार नाटकाचा जबरदस्त प्रयोग नागसेन बुध्दविहारात सादर झाला. गटारीकरणाच्या भीषण रात्रीचा अस्त घडविणारी क्रांतिकारी पहाट दाखवणारे चित्र दिगदर्शकाने हुबेहूब टिपले. सर्व कलाकारांनी उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. दुष्यंता रामटेके, बालाजी जगतकर, गणेश शिंदे, ह्यांनी केले होते तर कार्यक्रमासाठी कबीर जाधव, राहुल साळवे ह्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आणि आभार डॉ. दुष्यंता रामटेके ह्यांनी मानले.



# महिलेचा प्रामाणिकपणा -२ लाखांचा मुद्देमाल मुळ मालकाला परत

**दैनिक वादळ वार्ता
पालघर/सौरभ कामडी**

खोडाळा येथे राहणारी महिला शैला समाधान खाडगीर यांना प्रवासा दरम्यान कसारा लोकल मध्ये मिळून आलेली लेडीज पर्स सदर महिलेने पोलिस दुरक्षेत्र खोडाळा येथे प्रामाणिकपणे पोलिस कर्मचाऱ्यांच्या हवाली केली आहे.पर्स मध्ये असलेल्या भ्रमणध्वनीवर आलेल्या कॉलवरुन तपास काढून खोडाळा पोलिसांनी शहापूर तालुक्यातील वाशिंद येथील मुळ मुद्दे माल मालक असलेल्या श्रीमती रोहिणी सुरज सिंग यांना पोलीस ठाण्यात बोलावून खातरजमा करुन सदर मुद्देमाल रोहिणी सिंग यांच्या हवाली केला आहे. याबाबत पोलिस दुरक्षेत्र खोडाळा यांच्या कडून समजलेली वस्तूस्थिती अशी की,शैला समाधान खाडगीर या महिलेला रेल्वे प्रवासा दरम्यान कसारा येथे एक लेडीज पर्स सापडली होती.सदर पर्समध्ये मंगळसूत्र - 3 तोळे, पैंजण चांदीच 1 ,जोडी , जोडवी चांदीच 2 नग , लॉकेट सोन्याचे 01 ग्राम , रोख रक्कम रुपये 4 हजार , रेडमि कंपनीचा मोबाईल फोन 1 असा अंदाजे 2 ते सव्वादोन लाखांचा ऐवज मिळून आला आहे.सोन्याचे दागिने आणि रोकड पाहून सदर महिला भयभीत झाली होती.मात्र प्रामाणिकपणा आणि भिती यामूळे सदरचा ऐवज खोडाळा पोलिसांच्या हवाली करुन सदर महिला भितीपोटी निघून गेली होती.



दरम्यान पो.हवालदार संजय बागुल व पोलिस अंमलदार श्रीरंग शेळके यांनी खातरजमा करुन पर्समध्ये असलेल्या मोबाईल वर आलेल्या कॉल वरुन वाशींद ता शहापूर ( ठाणे )येथील राहणारी महिला रोहिणी सुरज सिंग यांची असल्याचे समजले आसता त्यांचेशी संपर्क करून त्यांना पोलीस दुरक्षेत्र खोडाळा येथे बोलावून त्यांचे ताब्यात मुद्दे मालासहित पर्स दिली असल्याचे खोडाळा पोलिसांनी सांगितले आहे.

**महिलेच्या प्रामाणिकपणाचा सत्कार करणार..?**

याबाबत मोखाडा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रदीप गिते यांच्याशी संपर्क साधला असता श्रीमती शैला समाधान खाडगीर या महिलेच्या प्रामाणिकपणाचे तोंड भरून कौतुक केले आहे.सदरची महिला ही भितीपोटी निघून गेली असली तरी तीचा यथोचित गौरव होणे आवश्यक असल्याने यथावकाश त्यांच्या प्रामाणिकपणाचा यथोचित गौरव करण्याचा मानस गिते यांनी व्यक्त केला आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त खोडाळा येथील मायरा क्लिनिक येथे मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर.

**दैनिक वादळ वार्ता
पालघर/सौरभ कामडी**

जागतिक महिला दिनानिमित्त खोडाळा येथील मायरा क्लिनिक येथे मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.मोखाडा पंचायत समितीचे उपसभापती प्रदीप वाघ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्या कुसुम झोले, जेष्ठ नेते प्रल्हाद काका कदम, डॉ मिठाराम कडव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रदीप वाघ यांनी सांगितले की महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, तपासणी करून घेतली पाहिजे, महिला डॉक्टर वर्षा घोडेराव यांच्या प्रयत्नातून हि गोष्ट शक्य झाली आहे असे प्रतिपादन प्रदीप वाघ यांनी व्यक्त केले. खोडाळा पंचक्रोशीतील शेकडो महिला आरोग्य तपासणी शिबिराला येऊन तपासणी करून घेतली, मोफत औषधोपचार देखील करण्यात आले.नाशिक येथील तज्ञ डॉक्टर यांनी तपासणी केली.




या प्रसंगी प्रदीप वाघ उपसभापती, कुसुम झोले जिल्हा परिषद सदस्या, प्रल्हाद काका कदम, डॉ मिठाराम कडव, आशा झुगरे पंचायत समिती सदस्य, मिलिंद झोले, निलेश झुगरे,लता वारे सरपंच, गीता पाटील सरपंच, योगेश दाते सरपंच, प्रमिला भागडे सरपंच, सुलोचना गारे, सरपंच, नंदकुमार वाघ उपसरपंच, मोहन मोडक उपसरपंच, मंगेश दाते, संजय वाघ, गणेश खादे उपस्थित होते शिबिराचे आयोजन मायरा क्लिनिक च्या डॉ वर्षा घोडेराव यांनी केले होते.

# केज येथे भव्य रक्तदान शिबीरात १९, रक्तदात्यांनी केले रक्तदान.

**वादळवार्ता/केज**

केज शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये युवकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत बहुसंख्य रक्तदात्यांनी रक्तदान केले .याबाबतची सविस्तर माहिती अशी की, रविवार दिनांक १० मार्च २०२४ रोजी केज शहरातील संत सावता माळी मंदिर येथे भव्य रक्तदान शिबिरास सुरुवात झाली.या रक्तदान शिबिराचे आयोजन ॲड. निखिल बचुटे, आरशद शेख, डॉ. श्रेयस मंत्री, हनुमंत नेहरकर, ॲड. राहुल वाघमारे, धीरज कुचेकर यांनी केले होते.



या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार पृथ्वीराज साठे, या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जन विकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, केज न्यायालयाचे सरकारी वकील ॲड. संतोष देशपांडे, यांच्या सर्व पत्रकार बांधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलन प्रा. हनुमंत सौदागर यांनी केले. या शिबीरास केज शहरासह तालुक्यातील युवकांनी, नागरिकांनी या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून रक्तदान १९,रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी, मा.आमदार पृथ्वीराज साठे, सुरेश ( तात्या ) पाटील, भाई मोहन गुंड, चिंतामण सत्वधर, पत्रकार दशरथ चवरे, नंदकुमार मोरे, रमेश गुळभिले, दत्तात्रय हंडीबाग, तात्या गवळी, महादेव दळवे, चंद्रकांत पाटील, सह अनेक युवक, नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.

# मनोज जरांगे पाटील यांची बेलगुडवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाला भेट

**जेसीबीतून फुलांची उधळण करत ग्रामस्थांकडून जंगी स्वागत ; विद्यार्थ्यांना कुणबी प्रमाणपत्राचे केले वाटप**



वादळवार्ता/गेवराई

तालुक्यातील बेलगुडवाडी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी भेट देत विद्यार्थ्यांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले. यावेळी बेलगुडवाडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्यावर जेसीबीतून फुलांची उधळण करत जंगी स्वागत केले. दि.5 मार्च रोजी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा बीड - पिंपळनेर - नाथापूर - गेवराई असा दौरा होता. दरम्यान बेलगुडवाडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांना गावात सुरू असलेल्या सप्ताहाला भेट देण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी हे निमंत्रण स्वीकारून रात्री 10:30 वा त्यांनी या सप्ताहाला भेट दिली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्यावर जेसीबीतून फुलांची उधळण करत जंगी स्वागत केले. यानंतर सरपंच सौ.लताबाई राधाकिसन जाधव व गावातील महिला भगिनींनी त्यांचे औक्षण केले. या दिवशी सप्ताहात ह.भ.प. महंत स्वामी योगिराज महाराज रामगडकर यांचे कीर्तन सुरू होते. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनीही काही काळ या कीर्तन श्रवणाचा लाभ घेतला. याप्रसंगी सर्व ग्रामस्थांच्या वतीने कीर्तनकार हभप स्वामी योगीराज यांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी या सप्ताहाच्या व्यासपीठावरून आपले मनोगत व्यक्त करताना अरक्षणाविषयी सरकारच्या बाबतीत कुठलेही राजकीय भाष्य न करता फक्त ग्रामस्थांच्या आग्रहाखातर आणि संप्रदायाचा एक सेवक म्हणून या सप्ताहाला भेट दिली असून हा सामाजिक एकोपा कायम टिकून ठेवावा असे अवाहन केले. यानंतर त्यांच्या हस्ते गावातील 10 विद्यार्थ्यांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले. या कार्यक्रमाला परिसरातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीत २९ एप्रिल रोजी ब्राह्मण बहुद्देशीय सभेचा ४४वा.सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा!

**नावनोंदणीसाठी संपर्क साधावा – ब्राह्मण सभा**

**वादळवार्ता/परळी**

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने यावर्षी ४४ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा येत्या २९ एप्रिल २०२४ रोजी होणार आहे.संपूर्ण महाराष्ट्रात नियोजनबध्द सोहळ्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात आपल्या मुलांचा उपनयनसंस्कार करण्यासाठी लवकरात लवकर नावनोंदणी करून घ्यावी असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या ४३वर्षापासून ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने अविरतपणे हा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उपक्रम चालवला जातो.शानदार आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. यावर्षीचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा सोमवार दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी वैद्यनाथ मंदिर दर्शन मंडप परळी वै. येथे स.११.१२ वा. संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी ५०१ रु.नोंदणी शुल्क ठेवण्यात आले आहे.या सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात आपल्या उपनीत मुलांची नावनोंदणी करण्यासाठी बंडू महाराज टिंबे (दक्षिणमुखी गणेश मंदिर परळी वै.)मो.क्र.८९७५२९२१११, सचिन जोशी (जोशी मेडिकल मोंढा परळी वै.) मो.क्र.९९२२२६१७४०, गिरीश प्रयाग (प्रयाग इलेक्ट्रिकल I D B I बँकेसमोर) ९०२८८१११७२, श्रीकांत करमाळकर मो. क्र. ७०२०८०१३७८,जयराम गोंडे (स्माईल फोटो स्टुडीओ) मो.क्र.९८२३१३७२९५, प्रमोद औटी, राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक मो.क्र. ९०२८८१११७३, हेमंत लोंढे (सिरसाळा)मो.क्र.९४२३७५७२१५, प्रदीप कुलकर्णी (घाटनांदूर) मो.क्र.९४२२२४०७६१, शैलेश कुलकर्णी (अंबाजोगाई) मो.क्र. ९४२२३३०३३७, प्रशांत गुरु जोशी (धर्मापुरी) ७२७६३४३७१२, कृष्णा गुरु जोशी (नागापूर) मो.क्र.९६८९८५११६१, विश्वांभर देशमुख ९६५७६५६९५१ (गोविंदा गोविंदा जनरल स्टोअर्स) मो.यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा, स्वा.वी.दा. सावरकर प्रबोधिनी, पेशवा युवा संघटन,ब्राह्मण महिला आघाडी,ब्राह्मण युवक संघटना आदींनी केले आहे.

# मोदी सरकार हटाव संविधान बचाव यासाठी आम आदमी पार्टी इंडिया आघाडीत सहभागी

**मा. वैजनाथ राठोड सहसचिव महाराष्ट्र राज्य आम आदमी पार्टी**

**माजी सैनिक अशोक येडे जिल्हा अध्यक्ष आम आदमी पार्टी बीड**

**आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांना इंडिया आघाडीने सन्मानाने बोलवले तर उमेदवार निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करतील**

**वादळवार्ता/बीड**

रविवार बीड येथे महाराष्ट्राचे सहसचिव मा. वैद्यनाथ राठोड यांची शासकीय विश्रामगृह बीड येथे बैठक संपन्न मा. वैद्यनाथ राठोड सहसचिव महाराष्ट्र राज्य आम आदमी पार्टी आढावा बैठक घेण्यासाठी बीड येथे आले असता सर्व कार्यकर्त्यांचा व पदाधिकाऱ्यांचा आढावा घेतला बीड जिल्ह्यातील आम आदमी पार्टीचे काम पाहून आनंदित झाले. बीड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना त्यांनी बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांचा व तालुकाध्यक्षांचा आढावा घेतला हा सर्व आडवा घेऊन कार्यकर्त्यांना येणाऱ्या निवडणुकांमध्ये असणारी आम आदमी पार्टीची भूमिका आम आदमी पार्टी इंडिया आघाडी



सोबत फक्त आणि फक्त मोदी हटाव देश बचाव संविधान बचाव याच भूमिकेने याच उद्देशाने या इंडिया आघाडी सोबत आहे इंडिया गाडीतील उमेदवाराने आम आदमी पार्टीचा दिल्ली, पंजाब, गुजरात, गोवा, येथील निवडणूक प्रचाराच्या अनुभवाची मदत घ्यावी ती पण सन्मानाने कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची हेळसांड चालणार नाही ही देखील आघाडीने दक्षता घ्यावी या बैठकीमध्ये आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे यांनी म्हटले की आम आदमी पार्टीचा कार्यकर्ता पदाधिकारी येणाऱ्या निवडणुकांमध्ये इंडिया आघाडीच्या उमेदवारासाठी जीवाचे रान करील याची कसलीही शंका नसली पाहिजे परंतु इंडिया आघाडीतील सहकारी मित्र पक्षांनी त्यांना त्यांचा सन्मान दिला पाहिजे व सन्मानाने बोलावलं पाहिजे जर कोणी त्यांची हेळसांड करण्याचा प्रयत्न केला तर स्वतःचा निर्णय घेण्यासाठी आम आदमी पार्टीचे जिल्हा अध्यक्ष हे स्वातंत्र्य असतील असे सहसचिव महाराष्ट्र मा. वैजनाथ राठोड यांच्यासमोर खणखणून सांगितले याच बैठकीमध्ये समाजसेविका सो किसकींधाताई पांचाळ यांना रणरागिनी पुरस्कार मिळाल्याबद्दल सहसचिव यांच्या हातसे त्यांचे शाल व श्रीफळ देऊन आम आदमी पार्टीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले सर्व कार्यकर्ते या बैठकीमध्ये तालुक्यातील तालुकाध्यक्ष कार्यकर्ते यांनी आपल्या क्षेत्रातील सचिवांसमोर आढावा मांडला व माहिती दिली या बैठकीमध्ये काही पद नियुक्ती देण्यात आली. यामध्ये जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब ढाकणे यांची शिरूर पाटोदा आष्टी या मतदार संघामध्ये जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम पाहतील व या तिन्ही तालुक्यांचा



आढावा घेऊन कार्यकर्त्यांना जोडण्याचं काम करतील त्यांना पुढील कार्यासाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या या बैठकीत जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक माननीय अशोक येडे जिल्हा उपाध्यक्ष माननीय दादासाहेब जी सोनवणे, जिल्हा सचिव रामधन जमाले कोषाध्यक्ष कैलास चंद्र पालीवाल बीड शहराध्यक्ष सय्यद सादेक बीड शहर सचिव मिलिंद पाळणे,तालुका अध्यक्ष भीमराव कुठे बीड तालुका उपाध्यक्ष आजम खान व रामेश्वर गव्हाणे, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा अध्यक्ष व केज तालुकाध्यक्ष माननीय नासिरजी मुंडे बीड तालुका अल्पसंख्याक विभागाचे तालुका अध्यक्ष रफिक पठाण शिरूर तालुका अध्यक्ष आसमान जी जरांगे पाटील , रामभाऊजी शेरकर शिरूर शहर अध्यक्ष विष्णू बाबा गिरी शिरूर तालुका सचिव अंबादास चव्हाण युवक संघटन मंत्री प्रवीण पवार तालुका संघटन मंत्री दत्ता सुरवसे विक्रम नागरगोजे वडने साहेब राजेंद्र पोकळे इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# धुनकवाड येथे धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्र उत्साहात साजरी.



**वादळवार्ता/किल्ले धारूर**

धारूर तालुक्यातील धुनकवाड गावचे ग्रामदैवत व डोंगर पट्ट्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून महाशिवरात्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामस्थांनी प्रत्येक घरासमोर सडा-सारवण करत रांगोळी काढून धुनकेश्वराच्या पालखीचे स्वागत गेले गावातून धुनकेश्वराच्या पालखीचे टाळ-मृदंगाच्या गजरात वाजत-गाजत भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली असून पालखीचे पुजन करण्यात आले व हर-हर महादेवाच्या गर्जनाने धुनकवाड नगरी दुमदुमून गेली होती. गेल्या अनेक वर्षांपासून या पालखीचे मानकरी हे भोई समाजाकडे असुन पुजारी महादेव कोळी हे आहेत. डोंगरपट्ट्यातील उपळी,हिवरगव्हण,पहाडी पारगाव ,पहाडी दहिफळ,सोनिमोहा,अंबेवडगाव,चिंचवण आदि गावातील भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला असून भाविक भक्तांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी महिला,पुरुष,वयोवृद्ध,युवक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा उद्योग परिषदेचे मोठे यश

**35 उद्योगांसोबत सामंजस्य करार ;659 कोटी रुपयांची गुंतवणूक**

**वादळवार्ता/बीड**

जिल्हा उद्योग परिषदेच्यावतीने आज जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये 35 उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार करण्यात आला. ज्याची एकूण किंमत 659 कोटी रुपये आहे. आज येथील ग्रँड यशोदा हॉटेलमध्ये जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक श्री. यशवंते,



वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी के. जी. तांदळे यावेळी उपस्थित होते.आज झालेल्या परिषदेला मोठे यश मिळाले असून या ठिकाणी 35 उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार करण्यात आले ज्यांची एकूण गुंतवणूक 659 कोटी इतकी आहे.

आज झालेल्या परिषदेस विविध नव उद्योजक, उद्योग संघटना , संबंधित शासकीय यंत्रणा, सामंजस्य करार धारक असे एकूण 300 प्रतिनिधी उपस्थित होते.

झालेल्या परिषदेसाठी आपल्या जिल्ह्यात एकूण सहाशे करोड गुंतवणुकीचे उद्दिष्ट होते. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत आयोजित कार्यक्रमात ते उद्दिष्ट पार पडले. जिल्ह्यात गुंतवणूक व रोजगार वाढावा या दृष्टीने हा कार्यक्रम असून आज झालेल्या परिषदेत महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. यापेक्षा अधिक निवडणूक जिल्ह्यामध्ये नजीकच्या काळात वाढेल. अनेक बेरोजगारांना रोजगार मिळेल असा या परिषदेत व्यक्त करण्यात आला.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
वादळ वार्ता

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पक्ष आणि चिन्हचा वादवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पक्ष आणि चिन्हचा वादवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोध शरद पवार गटाकडून याचिका दाखल करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाची आज मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे. भाजप आणि काँगेस दोन्ही पक्षांच्या केंद्रीय निवडणुक समित्यांची बैठक आज होणार आहे. यामध्ये जागावाटप आणि उमेदवार निश्चित करण्यात येणार आहे. लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी जय बाबाजी भक्त परिवार रिंगणात उतरणार आहे. आध्यात्मिक गुरू शांतीगिरी महाराज हे नाशिकमध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे दौऱ्यावर असताना यांची भेट घेतली होती.

# देशात परिवर्तनाची लाटलोकसभा निवडणुकीनंतर परीवर्तन अटळ-ईश्वर मुंडे

**वादळवार्ता/पाटोदा**

मोदी सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण केले नाहीत नाहीत त्यामुळे लोक नाराज असून देशात इंडिया आघाडीचे उमेदवार हे बहुमताने निवडून येतील लोकसभा निवडणुकीत परिवर्तन अटळ असल्याचे प्रतिपादन शरद पवार गटाचे बीड लोकसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवार ईश्वर मुंडे यांनी पाटोदा येथील पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केली पाटोदा येथे शरदचंद्र राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालय येथे रविवारी सकाळी 11 वाजता पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आलं होतं यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शिवभूषण जाधव राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव व तसेच शिवसेना ठाकरे गटाचे तालुका अध्यक्ष मुकुंद शिंदे सह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते यावेळी बोलताना ईश्वर मुंडे यांनी सांगितले की देशात लोकसभा निवडणूकीचे बिगूल केंव्हा ही वाजू शकते.सर्व पक्ष त्या दृष्टीने कामाला लागलेले आहेत.

भाजप बीड लोकसभेसाठी पंकजाताई मुंडे यांना निवडणूकीसाठी रिंगणात उतरवेल असे संकेत दिसत आहेत.तर त्यांच्या विरोधात इंडीया आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार पक्ष आपला उमेदवार देणार आहे.माजी मंत्री जयसिंग गायकवाड,प्रा.ईश्वर मुंडे,डॉ.नरेंद्र काळे,प्रा.सुशीलाताई मोराळे,माजी आ.साहेबराव दरेकर,भाई गंगाभिषण थावरे हे संभाव्य उमेदवार म्हणून जन संपर्क करत आहेत. रविवारी प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे जन संपर्कानिमित्त पाटोदा येथे आले आसता ते पत्रकारांशी बोलतांना म्हणाले की, मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने जनतेला दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केलेली नसलेल्यामुळे जनतेत तीव्र



नाराजी आहे. महागाई,बेरोजगारी,शेतीमालाला भाव नाहीत,शेतकरी विरोधी कायदे या मुळे असंतोष निर्माण झालेला आहे,शासकीय कंपन्यांचे खाजगीकरण,शासकीय नौकऱ्यांचे कंत्राटीकरण,महाराष्ट्रातील उद्योगांचे गुजरातला अपहरण करणे, बीड जिल्ह्यात केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाचा एक ही प्रकल्प उभा नाही यामुळे अनेक बेरोजगार तरुण झाले आहेत यामुळे जनता नाराज आहे भारतीय जनता पक्षामध्ये भ्रष्टाचाराचे आरोप असलेले लोक जाऊन स्वच्छ झालेले आहेत लोक आता सर्व समजत आहे सध्या जनतेत भारतीय जनता पक्ष संदर्भात असंतोष पसरलेला आहे लोकसभेच्या निवडणुकीत जनता भाजप विरोधी मतदान करतील परीणामी देशात लोकसभा निवडणूकीत परिवर्तन होऊन इंडीया आघाडीचे उमेदवार निवडून येतील यावेळी त्यांनी शरद चंद्र पवार साहेब हे बीड जिल्ह्याचे उमेदवार देतील त्या उमेदवाराचा आपण प्रचार करू यावेळी त्यांनी आपण सुद्धा बीड जिल्हा लोकसभा उमेदवारीची पक्षाध्यक्ष माननीय शरद पवार यांच्याकडे मागणी केली असल्याचे सांगुन आपण 1990 पासून शरद पवार यांचे खंदे समर्थक असून अनेक सामाजिक क्षेत्राशी आपण निगडित असल्याने आपला जनसंपर्क दांडगा असल्याचेही यावेळी त्यांनी नमूद केले . या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव,लिगल सेलचे ॲड.नारायण जाधव,सेवानिवृत्त अधिकारी सेलचे श्रीराम टेकाळे,युवक अध्यक्ष विनोद पवार,विद्यार्थी आघाडी गणेश रनदिवे,जिल्हा कार्यकारणीचे ॲड, सय्यद वहाब,राष्ट्रीय कॉंग्रेस तालुकाध्यक्ष राहूल जाधव,शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे,वंचीत बहुजन आघाडीचे विठ्ठल नाईकवाडे यांचे सह पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थीत होते.

# सावित्रीमाई फुले यांच्यामुळेच ज्योतिबांना महात्मा होता आले :- सौ. सुनीता मोदी

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

क्रांतीज्योती माता सावित्रीमाई फुले यांच्यामुळेच ज्योतिबा फुले यांना महात्मा ज्योतिबा फुले बनता आले अशी भावना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्या सावित्रीमाई फुले यांच्या पुण्यस्मरन निमित्ताने पतसंस्थेत त्यांना अभिवादन प्रसंगी बोलत होत्या. याप्रसंगी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांच्यासह संचालिका खडकभावी शोभा बाबू,रापतवार सविता विजय,चोकडा जमुना जयप्रकाश,मस्के अंजली विष्णुपंत, मोहिते सायली सुहास, खंडाळे सुरेखा बाबुराव, यांच्यासह जया मुडेगावकर, तसेच प्रेमा बरदापुरकर या उपस्थित होत्या.

यावेळी प्रथम सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. अभिवादन प्रसंगी बोलताना पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता



राजकिशोर मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्याकाळी महिला , मुली तथा बहुनज समाजातील मुले व पुरुषांना देखील शिक्षण घेण्यासाठी बंदी घालण्यात आली होती. या बंदीला झुगारून समाजातील मुली महिलांना तसेच पुरुषांना शिक्षणासाठी प्रेरित करण्यासाठी माता सावित्रीमाई सरसावून पुढे आल्या.

या कामात त्यांना अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागला. मात्र अशाही परिस्थिती न डगमगता त्यांनी समाजातील महिला, मुली व पुरुषांना अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर पडून शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले.संबंध मानवजातीच्या उद्धारासाठी माता सावित्रीमाई फुले यांनी हा मूलमंत्र दिला आहे. परंतु आज ही हा समाज या विचारांपासून दूर आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फले यांचे आयुष्य याच लढ्यासाठी समर्पित झाले आहे. माता साविञीमाईचे कार्य महान होते यांच्यामुळेच महात्मा जोतीराव फुले यांना महात्मा होता आले. माता साविञीमाईची ओळख केवळ पहिल्या महिला शिक्षिका एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. तर त्यांच्या कार्याचा परिघ विशाल असल्याचे सुनीता मोदी यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक सागर कंगळे, योगेश्वरी मल्टिस्टेटचे व्यवस्थापक संतोष ढगे, सीमा मुळे, सचिन काशीद , अंकुश माने हे उपस्थित होते.

# महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण व दलित मित्र पुरस्कार बन्सी गायसमूद्रे यांना जाहीर .

**वादळवार्ता/किल्ले धारूर**

धारूर तालूक्यातील खोडस येथील भुमिपूत्र बन्सी भिवाजी गायसमूद्रे यांना राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे वतीने देण्यात येणारा डा? बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण व दलित मित्र पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला असून त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहै.महाराष्ट्र शासनाने नुकतेच अनुसूचित जाती,जमाती,भटके विमुक्त, ईतर मागास,दिव्यांग,कुष्ठरोगी या क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री अध्यक्ष असलेल्या राज्य स्तरीय समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलीत मित्र व समाज भुषण पुरस्कार सन २०१९ -२०, २०२०-२१ ,२०२१-२२ व २०२२-२३ दि.७ मार्च २०२४ रोजी शासन निर्णय काढून जाहीर केले आहेत. समाज उत्थानाचे मौलीक कार्य करणारे हात पुढे यावेत,पुढे आलेल्यांचा सन्मान व्हावा व पुढील पिढीला प्रेरणा मिळून नवीन समाज सेवक तयार व्हावेत या उदात्त हेतूने सन.१९७१-७२ पासून हे पुरस्कार योग्य व्यक्तींना दिले जात आहेत व १९८९ पासून संस्थांना ही पुरस्कार प्रदान करण्यात येत आहेत.



खोडस ता.धारूर जि.बीड येथील भूमिपुत्र व लोहा जि.नांदेड येथे आपली कर्म भूमी तयार करणारे बन्सी भिवाजी गायसमुद्रे यांना सन.२०२१-२२ चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार जाहीर केला आहे.धारूर तालुक्यांतील भुमीपुत्राला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्या बद्दल धारूर तालुका व परिसरात आनंद व्यक्त होत आहे. बन्सी भिवाजी गायसमुद्रे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल आ.मोहनराव हंबर्डे ,आ.प्रकाश सोळंके,प्रा. ईश्वर मुंडे,भारत वानखेडे, विलास साळवे ,पत्रकार विनोद महाबळे ,पत्रकार बाळासाहेब बुध्दे ,धारूर येथील सनी गायसमुद्रे,रत्नाकर डोंगरे,चंद्रकांत माचवे,यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. सदरील पुरस्काराचे वितरण दि.१२ मार्च २०२४ रोजी नॅशनल सेंटर फॅार परफॅार्मिंग आर्ट नरीमन पॅाइंट,मुंबई-२१ येथे होणार असल्याचे शिवानंद मिनगिरे(सहाय्यक आयुक्त नांदेड),दत्ता हरी कदम (समाज कल्याण निरिक्षक,नांदेड) यांनी लेखी पत्राद्वारे अभिनंदन करून कळवले आहे.

# संस्कृती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री डॉ. दत्ता नलावडे सर रयत सामाजिक प्रतिष्ठान राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित..!

**वादळवार्ता/ बीड**

मुलांच्या विकासासाठी शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा समजला जाणारा ‘रयत सामाजिक प्रतिष्ठान राज्यस्तरीय पुरस्कार - २०२४ ‘ बालविकास सामाजिक प्रतिष्ठान अंतर्गत संस्कृती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र गुरुकुल संघटनेचे अध्यक्ष, माजी न्यायाधीश, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री डॉ. दत्ता नलावडे सर यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी रयत सामाजिक प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्री ॲड. अविनाश गंडले, कैलास दादा पठारे, कोळी समाजाचे भोईर सर, रयत प्रतिष्ठान चे विठ्ठल माने, सिने अभिनेते महेंद्र खिल्लारी, ओबीसीचे प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण लटपटे तसेच प्रती जरांगे पाटील इ. मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर न्याय भवन बीड येथे प्रदान करण्यात आला.

गेली अनेक वर्ष शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आपले सर्वस्वी झोकून देऊन शाळा हेच माझे दैवत मानून आपले कार्य सतत तेवत ठेऊन अखंड चालू आहे. या संस्कृती विद्यालयाची स्थापना झाल्यापासून अतिशय खडतर प्रवास पार करत आपली शैक्षणिक चळवळ सुरू आहे. या पूर्वी डॉ. दत्ता नलावडे सर यांना विविध विभागस्तरीय तसेच राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी आपल्या शाळेमध्ये पंचसूत्री पद्धतीने अध्यापन पद्धती सुरू करून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिणाम निर्माण केला आहे. विविध उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या सुप्तगुनांना वाव मिळवून दिला आहे. या शाळेमध्ये त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून दरवर्षी शैक्षणिक सहल , स्नेहसंमेलन, चित्रकला स्पर्धा, क्रीडा,सामान्य ज्ञान स्पर्धा तसेच इंग्लिश स्पोकन असे विविध प्रकारचे उपक्रम राबवून जिल्ह्यामधे आपली वेगळीच ओळख



निर्माण केली आहे. डॉ. दत्ता नलावडे हे डोमरी गुरुकुलचे माजी विद्यार्थी आहेत. तसेच परभणी येथील [illegible]भुमी येथे अध्यापनाचे काम केले आहे. बीड येथे न्यायाधीश म्हनून सुध्दा काम केले आहे. नुकताच त्यांचा द.बा. घुमरे आदर्श शिक्षक पुरस्कार म्हणून गौरवण्यात आले आहे. २०२३-२०२४ चा ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा ‘ यामध्ये तालुक्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. बीड शहरापासून जवळच असलेल्या पिंपर गव्हाण म्हसोबा फाटा जवळ ही शाळा अतिशय निसर्गरम्य परिसरात आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, महिला, उद्योग , विधीन्याय, पत्रकारिता, प्रशासकीय , सांस्कृतिक आणि कला इ. क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला या पुरस्काराने गौरविण्यात येते. हा पुरस्कार मला प्रेरणा देणारा ठरेल असे यावेळी बोलताना स्पष्ट केले. या प्रसंगी रयत सामाजिक प्रतिष्ठान चे अध्यक्ष ॲड. अविनाश गंडले, कैलास दादा पठारे, सचिव आ.जी. माने , सिने अभिनेते महेंद्र खिल्लारी, ओबीसी प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण लटपटे, रिल्स स्टार, विविध स्तरातून अनेक मान्यवर तसेच शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )